पुणे जिल्हा परिषद - Process Mapping - Template					
विभागाचे नाव :- कृषि विभाग					
अ.क्र.	प्रक्रिया स्थिती (Stages of Process Mapping	बाब		माहिती	शेरा
PC1	प्रक्रिया ओळख व वर्गीकरण (Process Identification and Classification)	प्रक्रियेचे नाव		डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना-सन 2020-2021 मध्ये निधी वितरण- लाभार्थीस अनुदान वितरीत करणे (PFMS प्रणालीव्दारे).	
PC2		कार्यासन संकेतांक (उदा.आस्था1 लेखा 4)		विशेष घटक योजना	
PP1	प्रक्रिया प्रस्तावित करणे (Process Proposal)	प्रक्रिया प्रस्तावित करणाऱ्या अधिकारी/ कर्मचारी (maker)-पदनाम		वरिष्ठ सहाय्यक	
PP2		संदर्भिय कायदा, नियम मॅन्युअल, अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रक, न्यायालय निकाल, शासन पुस्तके, पत्रे इत्यादी क्रमांकासह शिर्षक नमुद करावेत		**डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना** 1) मा. कृषि आयुक्तालय यांचेकडील मार्गदर्शक सूचना जा क्रं. विप्र-7/डॉ. बा.आं.कृ.स्वा.यो./ मासु /20-21/6080/21 दि. 15/2/21 अन्वये तांत्रीक मान्यता दिलेली आहे. 2)कृषी व पदुम विभागाचा शासन निर्णय क्रमांक डीबीटी-0920/ प्र.क्र.128/ 14अे, दि.23 फेब्रुवारी, 2021 व शासन पुरकपत्र क्रमांक: डीबीटी-0920 /प्र.क्र.128 /14-अे दि.4/3/2021 व मा. कृषि आयुक्तालय यांचेकडील मार्गदर्शक सूचना जा क्रं. विप्र-7/डॉ.बा.आं.कृ.स्वा.यो. / महाडीबीटी/ पीएफ एम एस/8572/2021 दि. 3/3/21	
PP3		प्रस्तावासोबत (आवश्यक असल्यास) घ्यावयाची कागदपत्रे उदा.विहित नमुन्यातील अर्ज, खरेदीचे बिल, आधार कार्ड आदी	लाभार्थी/ व्यक्तींची वैयक्तिक कागदपत्रे	महाराष्ट्र शासन, कृषि विभागाच्या mahadbtmahait.gov.in या शासनाच्या संकेतस्थळावर डिबीटी पध्दतीने अर्ज करण्यात येवून लॉटरी पध्दतीने निवडलेल्या लाभार्थ्यांनी शासन निर्णय व मार्गदर्शक सुचनेत नमुद केलेली सर्व कागदपत्रे अपलोड करावयाची आहेत. उदा.1)खरेदीचे बिल 2)7/12 उता-यावर विहीर नोंद असणे आवश्यक आहे.	
			कार्यालयीन कागदपत्रे	पंचायत समिती मधील कृषि अधिकारी (वि.घ.यो.) यांचेकडील 1) जियो टॅगिंगसह क्षेत्रीय पाहणी अहवाल 2) मापन पुस्तिका नोंदी जिल्हा स्तरावर 1) कामाचे बिल 2)PFMS व्दारे अनुदान अदाई देयक	
PP4		प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी आवश्यक उपक्रम, कामाचे वार्षिक नियोजन, परीक्षा, मेळावे, कागदपत्र तपासणी कॅम्प, विशेष मोहिमा, प्रचार प्रसिध्दी		-	
PP5		प्रक्रिया प्रस्तावित करताना जिल्हा परिषद विभाग/ पंस/ग्रापं/जि.प.कडील अन्य क्षेत्रिय कार्यालये तसेच शासनाच्या विभाग/ उपक्रम/ मंडळे/ महामंडळे/ मनपा/ नपा/ कटकमंडळे/ खाजगी संस्था यांचेकडून प्राप्त करावयाची माहिती, मान्यता, शिफारस		-	

PP6	प्रक्रिया प्रस्तावित करणे (Process Proposal)	तपासणी अधिकारी स्तर पदनाम (Checker) (स.प्र.अ/क.प्र.अ/ पर्यवेक्षीय अधिकारी)	कृषि अधिकारी (वि.घ.यो.), जिल्हा कृषि अधिकारी (वि.घ.यो.), कृषि विकास अधिकारी	
pp7		प्रक्रिया मंजुरी देताना पडताळुन पहावयाच्या बाबी	योजनेंतर्गत निश्चित केलेल्या अटी व शर्तीनुसार लाभार्थींच्या अर्जाची पडताळणी करण्यात येते. कृषि विकास अधिकारी यांनी अंतिम प्रदानासाठी प्राप्त झालेली देयके PFMS प्रणालीव्दारे मेकर म्हणून तपासून त्यांची लाभार्थीनिहाय PFMS DBT च्या विहित प्रपत्रात यादी तयार करुन आपले शिफारसीसह संबंधित मुख्य लेखा व वित्त अधिकारी पुढील कार्यवाहीसाठी पाठवावित. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी PFMS प्रणालीव्दारे चेकर या नात्याने अनुदान संबंधित लाभार्थ्यांस अदा करावेत.	
PA1	प्रक्रिया मंजुरी (Process approval)	मान्यता अधिकारी स्तर पदनाम (खातेप्रमुख/ इतर)	कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांचेकडून देयक तयार केले जाते. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, पुणे जिल्हा परिषद, पुणे यांचेकडून तपासणी करुन अंतिम देयक अदाई केली जाते. (PFMS व्दारे)	
PA4		यादी/ आराखडा मान्यता अधिकार समितीस असल्यास, समिती नाव	-	
PA5		Endorsement(समर्थन) अधिकारी स्तर पदनाम (मुकाअ/ अति मुकाअ/ संबधित खातेप्रमुख)	मा.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.पुणे	
PM1	प्रक्रिया त्रुटीशोध (process Mapping)	मंजुरी प्रक्रियेमध्ये सातत्याने आढळणाऱ्या आढळणाऱ्या त्रुटी	महाडी.बी.टी. पोर्टल व PFMS पोर्टल हे संलग्न असावे.	
PI1	प्रक्रिया सुधारणा(Process improvization)	अचुकता वेळेची बचत, मनुष्यबळ कार्यक्षम वापर, पारदर्शकता याकरीता माहिती तंत्रज्ञानाचा व संगणक आज्ञावली वापर करता येण्याजोगा उपप्रक्रिया/ बाबी	महाडी.बी.टी. ऑनलाईन प्रणाली सन 2020-2021 पासून कार्यान्वित झालेली असून ती आवश्यकतेनुसार बदल करुन विकसित करण्यात येत आहे.	
PI2		तांत्रिक (Technical) ज्ञान कमी पडत असल्यास प्रशिक्षण स्वरुप, अभ्यासक्रम	संगणक वापराबाबत तांत्रिक ज्ञान आवश्यक.	
PI3		मुळ संकल्पना, उद्देश, लेखा संहिता, प्राधिकरण यांचे अधिकार यास धक्का न लावता प्रक्रिया सुधारणे करिता शासन स्तरावर प्रस्तावित करावयाच्या बाबी	सदरची योजना महाराष्ट्र शासन, कृषि विभाग यांचेकडील मार्गदर्शक सूचनेनुसार राबविली जाते.	